नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०३/०६/२०२५ (मंगळवार)**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## ८५ लाख ८० हजारांचा मुद्देमाल जप्त, २ आरोपी अटक
## भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक ०२/०६/२०२५ रोजी भिवापुर पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या गौण खनीज रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी भिवापुर ते उमरेड रोड मौजा पांजरेपार शिवार येथे नाकाबंदी केली असता **१) १० चक्का टिप्पर क्र एम.एच. ४९ ए.टी २३८७ व २) १६ चक्का टिप्पर क्र. एम.एच ४० सी. एम ००७३ हे दोन वाहन मिळुन आले .** पंचासमक्ष वाहनांची पाहणी केली असता त्यात रेती असल्याचे दिसले. टिप्पर क्रमांक एम.एच. ४९ ए.टी २३८७ च्या चालकाला त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव **आशिष एकनाथ मेश्राम, वय २२ वर्षे, रा. घरतोडा,ता. लाखांदूर, जिल्हा भंडारा** असे समजले. टिप्पर क्रमांक एम.एच. ४० सी.एम ००७३ च्या चालकाला त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव **क्रिष्णा बाबूराव राऊत, वय ३१ वर्षे, रा.पाचगाव, ता. उमरेड, जिल्हा नागपूर** असे समजले. चालकांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. तसेच वाहन मालकाबाबत विचारणा केली असता टिप्पर क्रमांक एम.एच. ४९ ए. टी २३८७ चा मालक आरोपी नामे **दिनेश मनोहर सावरबांधे, रा. आसगाव, ता. पवनी , जिल्हा भंडारा** आणि टिप्पर क्र. एम.एच ४० सी.एम ००७३ चा मालक आरोपी नामे **चेतन तेलंग, रा. नंदनवन, नागपूर** अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली. चालकांनी मालकांच्या सांगण्यावरून शिवनाडा घाट, ता. पवनी, जिल्हा भंडारा येथील एक ठिया वरून रेती भरून अणल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्रमांक एम.एच. ४९ ए.टी २३८७ आणि त्यातील

६ ब्रास रेती किंमती २५,३०,००० /— २) टिप्पर क्र. एम.एच ४० सी.एम ००७३ आणि त्यातील १० ब्रास रेती किंमती ६०,५०,००० /— **असा एकुण ८५,८०,०००/रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद आरोपी वाहन चालक आणि मालक यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन भिवापुर येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम सहकलम १५ पर्यावरण सरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही चालक आरोपीतांना पोलीसांनी अटक केली आहे.**

## नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत घेण्यात आला रूटमार्च, दंगा काबु योजना ,शांतता समितीची बैठक

आगामी बकरी ईद सणोत्सव असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणेकामी नागपुर ग्रामीण जिल्हयात खालील पोलीस स्टेशनला रूट मार्च ,दंगाकाबु योजना आणि शांतता सिमती बैठक घेण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक ०२/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन केळवद येथे सपोनि श्री अनिल राउत, प्रभारी अधिकारी, केळवद पोलीस स्टेशन यांनी मशिद ट्रस्ट समितीचे प्रमुख पदाधिकारी व मौलाना अशी मुस्लीम बांधवांची बैठक घेतली. सदर बैठकीमध्ये बकरी ईद हा सण शांततेत साजरा करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

**पोलीस स्टेशन खापरखेडा** :—दिनांक ०३/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन खापरखेडा हद्दीत श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी ,कन्हान विभाग यांच्या उपस्थितीत खापरखेडा पोलीस स्टेशनचे अधिकारी, अंमलदार यांच्यासह आर.सी.पी. पथक यांनी रूट मार्च काढला. सदर रूटमार्च वलणी आणि सिल्लेवाडा गावात घेण्यात आला. रूट मार्च सोबत दंगा काबु योजना सुध्दा घेण्यात आली.

**पोलीस स्टेशन कन्हान** :—दिनांक ०३/०६/२०२५ रोजी पोलीस स्टेशन कन्हान येथे श्री संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी ,कन्हान विभाग यांच्या उपस्थितीत कन्हान पोलीस स्टेशनचे अधिकारी ,अंमलदार यांच्यासह आर.सी.पी. पथक यांनी रूट मार्च काढला. सदर

रुट मार्च हा पोलीस स्टेशन कन्हान ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते अशोक नगर ते धरमनगर ते छत्रपती संभाजी चौक ते दुर्गा माता मंदीर ते सुन्नी रजा मस्जिद पटेल नगर पिपरी ते गांधी चौक पर्यत घेण्यात आला.




AITUC
संयुक्त खदान मजदूर संघ







# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद २ आरोपी अटक,उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड**:— दिनांक ०२/०६/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, ठाणा शिवार येथे रेतीने भरलेले २ टिप्पर उभे असुन सदर टिप्परने अवैधरित्या गौण खनीज रेतीची चोरटी वाहतुक केली जाणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन पाहणी केली असता **१) टिप्पर क्रमांक एम. एच. ४९ ए. टी. ७२३५ आणि २) टिप्पर क्रमांक एम. एच. ४९ ए. टी. ७३३५ असे दोन टिप्पर मिळुन आले**. पंचासमक्ष वाहनांची पाहणी केली असता त्यात रेती असल्याचे दिसले. टिप्पर क्रमांक एम.एच.४९ ए. टी. ७२३५ च्या चालकाला त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव **सत्यकुमार सत्यनारायण गंझु, वय. ३१ वर्षे, रा. गरीब नवाज चौक ,वाठोडा, नागपूर** असे समजले. टिप्पर क्रमांक एम. एच. ४९ ए.टी. ७३३५ च्या चालकाला त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याचे नाव **मोहम्मद कलाम वल्द युनुस खान, वय ३६ वर्षे, रा. नागार्जुन लॉनचे समोर, बाहदुरा,नागपुर** असे समजले. त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. **तसेच वाहन मालकाचे नाव विचारले असता दोन्ही वाहनांचा मालक आरोपी समीम अन्सारी बकरीद अन्सारी, रा. बहादुरा रोड, नरसाळा, नागपुर हाच असल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्रमांक एम. एच.४९ ए.टी. ७२३५ आणि त्यातील ६ ब्रास किंमती १५,३००००/— रूपये २) टिप्पर क्रमांक एम. एच. ४९ ए.टी. ७३३५ त्यातील ६ ब्रास किंमती १५,३००००/— रूपये **असा एकुण ३०,६०,०००/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

नमुद आरोपी दोन्ही चालक आणि वाहन मालक यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन उमरेड येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम सहकलम १५पर्यावरण संरक्षण अधिनियम अधि,१३०,१७७ मोटार अधिनियम अन्वये गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही **चालक आरोपीतांना पोलीसांनी अटक केली आहे.**

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद
## आरोपी अटक, खापा पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन खापा**:— दिनांक ०२/०६/२०२५ रोजी खापा पोलीसांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी सिंदेवाणी शिवारातील सिरोंजीकडे जाणाऱ्या रोडवर नाकाबंदी केली असता मोटरसायकल क्र एम.एच—४९/सी.जी.—५५४२ येतांना दिसली. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला सुगधीत तंबाखु मिळुन आाला. मोटर सायकल चालक **आरोपी नामे रितेश मधुकर गेडाम, वय—३५ वर्ष रा. चंद्रनगर वार्ड क्र ८७, पारडी, नागपुर याचे ताब्यातुन १) पानमसाला राजश्री ब्रॅड,२) पानमसाला विमल ब्रॅड ,३) जाफरानी जर्दा तुलसी ब्रॅड ,४) पानमसाला रजनीगंधरा ५) सुगंधीत तंबाखु बाबा १२० ५) सुगंधीत तंबाखु व्ही —१ ६) सुगंधीत तंबाखु डबल ब्लॅक १८ असे एकुण १२.६० किलोग्रॅम प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती २१,६४२ /— रूपये आणि मोटरसायकल क्र एम.एच—४९/सी.जी.—५५४२ किंमती .५०,०००/—रूपये असा एकुण ७१,६४२ /—रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपी विरूद्ध पोस्टे खापा येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**नमुद आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक**:— दिनांक ०२/०६/२०२५ रोजी रामटेक पोलीस हे घोटीटोक येथील तपासणी नाक्यावर वाहनांची तपासणी करीत असतांना तुमसर कडुन रामटेक कडे एक टिप्पर येताना दिसला. पोलीसांनी चालकास वाहन थांबविण्याचा इशारा केला असता टिप्पर चालकाने

पोलीसांना पाहुन टिप्पर रोडच्या कडेला थांबवुन वाहन जागीच सोडुन पळुन गेला. पोलीसांनी नमुद टिप्पर क्रमांक १० चक्का टिप्पर क्र एम.एच. ४० ए.के. ४१५८ ची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात रेती असल्याचे दिसले. चालक वाहन सोडुन पळुन गेल्याने सदर चालक हा त्याच्या ताब्यातील टिप्परने अवैधरित्या गौण खनीज रेतीची विनापरवाना चोरटी वाहतुक करीत असल्याचे निष्पन्न झाले. **पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्र एमएच ४० ए. के. ४१५८ आणि त्यातील ८ ब्रास असा एकुण ४०,२४,०००/रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद वाहन चालक मालक आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल केला आहे.**

## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद १आरोपी अटक, १० जनावरांची सुटका, भिवापुर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापुर** :— दिनांक ०२/०६/२०२५ रोजी भिवापुर पोलीस रात्रगस्त करीत असतांना महसुल चेकपोस्ट नाका येथे निलज कडुन भिवापुर च्या दिशेने **बोलेरो पिकअप गाडी क्र. एम.एच ३६ ए.ए. ३४२७** हे वाहन संशयीत रित्या भरधाव वेगाने येताना दिसल्याने पोलीसांनी वाहन चालकास वाहन थांबविण्याबाबत इशारा केला असता वाहन चालकाने वाहन न थांबविता पुढे जावुन थोडया अंतरावर वाहन सोडुन आंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये एकुण **१० गोवंश जनावरे** दिसुन आले. नमुद जनावरांना चारपाण्याची कोणतीही सोय न करता, निर्दयते कोंबुन जनावरांची कत्तलीकरीता वाहतुक केली जात असल्याचे प्रथम दर्शनी दिसुन आले. तसेच सदर **वाहनाचा मालक आरोपी नामे प्रदीप शंकर भुरे, वय ३५ वर्ष, रा. जकात नाका, परीसर ताडेश्वर वार्ड, कोडेश्वर ता. पवनी जि. भंडारा हा असल्याबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** पोलीसांनी पंचासमक्ष एक बोलेरो पिकअप गाडी क्र. एम.एच ३६ ए. ए. ३४२७ किंमती ४,००,०००/— रूपये. व १० ( ३

गाई, ७ गोऱ्हे ) गोवंश जनावरे किंमती ६६,००० /— रूपये **एकुण किंमती ४,६६,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

**सदर प्रकरणी नमुद वाहनाचा चालक पाहीजे आरोपी आणि मालक नामे प्रदीप शंकर भुरे वय ३५ वर्ष रा. जकात नाका परीसर ताडेश्वर वार्ड, कोडेश्वर ता. पवनी जि. भंडारा यांच्या विरूध्द प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, महा. पशु संरक्षण अधिनियम, महाराष्ट्र पोलीस ॲक्ट सहकलम १३४, १७७ मोवाका सहकलम २८५, ४९, ३ (५) भा न्या संहीता अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलीसांनी मालक आरोपीला अटक केली आहे.**

## अवैधरित्या मोहाफुलांची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद खापा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन खापा** :— दिनांक ०२/०६/२०२५ रोजी खापा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, तवेरा गाडीमध्ये अवैधरित्या मोहाफुलांची वाहतुक केली जाणार आहे. अशी माहीती प्राप्त होताच पोलीसांनी तात्काळ ढकारा फाटा येथे नाकाबंदी केली असता तवेरा गाडी क्र एम.एच २६ ए.एफ १००६ हे वाहन येताना दिसले. पोलीसांनी वाहन चालकास वाहन थांबविण्याबाबत इशारा केला असता नमुद वाहन चालक आणि त्याचा साथीदार यांनी पोलीसांना पाहुन वाहन जागीच सोडुन आंधाराचा फायदा घेत पळुन गेले. पोलीसांनी पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता नमुद वाहनाच्या डिक्कीमध्ये ७ बोऱ्यामध्ये एकूण २४५ किलो मोहाफूल मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष एक तवेरा गाडी क्र एम.एच २६ ए.एफ १००६ किंमती ५,००,०००/— रूपये. आणि २४५ किलो मोहाफूल किंमती ११,०२५ /— रूपये **एकुण किंमती ५, ११,०२५ /— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**सदर प्रकरणी तवेरा गाडी क्र एम.एच २६ ए.एफ १००६ चा चालक आणि त्याचा साथीदार यांच्या विरूध्द कलम ६९,८३ म.दा.का सहकलम ६६/१९२ मो.वा.का अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने